
रावेर पोलीस स्टेशन
रावेर.

| | | |
|---|---|---|
| | रावेर पोलीस स्टेशन<br>फोन नंबर ०२५८४-२५०३३३<br>Email Id :- raverpi2@gmail.com | |
| रावेर पोलीस स्टेशन | जावक क्रमांक - /२०२६ | दिनांक :- ०६/०७/२०२६ |

**प्रेस नोट**

**मा.संपादक सो.**

----------

## रावेर तालुक्यातील अजंदा गावाजवळील रेल्वे ब्रिज जवळ लुट करणाऱ्या इसमांना रावेर पोलीसांनी केली २४ तासांच्या आत अटक.

रावेर पोलिस स्टेशन येथे दि. ०५-०७-२०२६ रोजी गुरंन ३३४/२०२६ भा.न्या.संहीता कलम ३०९(६),३५१(२)(३),३(५) प्रमाणे रस्ता लुट संबधी गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयात फिर्यादी शेख जाबीर शेख अमान वय- ४१ व्यवसाय - बांधकाम ठेकदार रा. फारुकी आजम कॉलनी , चिनावल ता. रावेर जि.जळगांव हे चिनावल येथे बांधकाम ठेकेदार असल्याने त्यांना मजुरी करीता नियमीत पणे मजुर हे लागत असतात व त्यामुळे ते इतर गावी नेहमी फिरस्ती वर असतात त्यांची ही बाब लक्षात ठेवुन त्यांना दि. ०४/०७/२०२६ रोजी मुस्तकीम नामक व्यक्तीने कॉल केला व मी आपणास दोन मजुर मिळवुन देतो असे आश्वासन दिले होते. त्यावरुन फिर्यादी यांनी दुसऱ्या दिवशी मुस्तकीम यास मजुर मिळतील का या बाबत विचारणा केली असता मुस्तकीम याने फिर्यादी यांना विवरा येथे बोलावुन घेतले व मजुर हे अजंदा गावी कामानिमीत्त गेले असल्याची बतावणी करुन आपण अजंदा गावी जावुन येवु असे सांगीतले. फिर्यादी व मुस्तकीम हे अजंदा रेल्वे पुलाजवळ गेले असता त्यांना पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा गाडीजवळ दोन इसम उभे दिसले व मुस्तकीम याने हेच ते मजुर असुन त्यांचे कडे गाडी थांबविण्यास फिर्यादी यांना सांगीतले. फिर्यादी यांना विश्वासात घेवुन त्यांनी आपण रोजंदारी बाबत बोलुन घेवु असे सांगुन शेताच्या आत बोलाविले व त्यातील एका आरोपीताने फिर्यादी यांच्य गळयावर चाकु ठेवुन लुट करण्याच्या इरादयाने पैशांची मागणी केली. परंतु फिर्यादी यांचे कडे खिशात ५००/- रुपये च असल्याने त्यांनी ते काढुन दिले होते. वरील आरोपीतांनी त्यांनतर फिर्यादी यांचा मोबाईल हिसकावुन फोन पे व्दारे त्याचा पिन जबरदस्तीने विचारुन एका अन्या खात्यावर वेळोवेळी ८०००/- रुपये वळवुन घेवुन त्या नंतर पसार झाले होते. फिर्यादी यांच्या माहीतीनुसार मुस्तकीम तसेच त्याचे दोन अज्ञात मित्रांविरुध्द रावेर पो.स्टे.ला गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाच्या एकंदर तपासात अजंदा गावाजवळील तसेच शिवारातील लावलेल्या कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले परंतु रात्रीची वेळे असल्याने आरोपीतांचे चेहरे अस्पष्ट येत

असल्याने तपासात आरोपीतांची ओळख पटत नव्हती. परंतु रावेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांना आरोपीतांच्या गाडी बाबत मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे खातरजमा करण्यास रावेर पोलिस स्टेशनचे डिबी पथक गेले असता आरोपी मुस्तकीम याने गुन्हयाची कबुली दिली आहे.

सदर गुन्हयात आरोपी ०१) शेख मुस्तकीम शेख अकील वय २२ वर्ष- रा फतेह नगर रावेर ०२)शेख मोईन शेख नईम वय -१९ रा. खिर्डी रोड विवरा ०३)फैजल बेग हितायत बेग वय १९ रा. शंकर प्लॉट रावेर जि.जळगांव यांना अटक करण्यात आली असुन त्यांचे कडुन गुन्हयातील मोटार सायकल क्रमांक- MH19ED5580 तसेच आरोपीतांनी गुन्हयात वापरलेले मोबाईल असा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयातील शेख मोईन शेख नईम हा सराईत गुन्हेगार असुन त्यावर रावेर पोलिस स्टेशन ला वयस्कर व्यक्तीस अशाच प्रकारे लुट करण्याचा गुन्हा दाखल होता.

सदर आरोपीतांकडुन अजुन बरेच लुटीचे गुन्हे बाहेर येण्याची शक्यता आहे.आरोपीतांना मा.न्यायालयात हजर केले असता आरोपीतांची दि. ०१/०७/२६ पावेतो पो.कोठडी मिळाली असुन आरोपीतांकडे गुन्हयाचा सखोल तपास चालु आहे.

सदर कार्यवाही ही मा. श्रीकांत धिवरे सो पोलिस अधिक्षक जळगांव , मा. श्री संदीप गावीत सो अप्पर पो. अधिक्षक जळगांव विभाग, मा.श्री अनिल बडगुजर पोलिस उपअधिक्षक फैजपुर विभाग, यांच्या मार्गदर्शनाने पोलिस स्टेशन रावेर मधील पो.नि.संदीप पाटील, पो.उप.निरीक्षक मनोज महाजन , पो.उप.निरीक्षक तुषार पाटील तसेच गुन्हे शोध पथकातील पो.हे.कॉ समाधान ठाकुर , विशाल पाटील , प्रमोद पाटील, श्रीकांत चव्हाण,सुकेश तडवी, यांनी केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास हा पो.उप.निरीक्षक मनोज महाजन हे करीत आहेत.

s/d

(संदीप पाटील )
पोलिस निरीक्षक
रावेर पोलिस स्टेशन